# शिवाजी विद्यापीठातर्फे आणखी २८ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या २२ मार्चपासून सुरू झालेल्या परीक्षांपैकी आणखी २८ परीक्षांचे बुधवारी निकाल जाहीर करण्यात आले. दरम्यान, २०१९-२० मधील एम.फिल.,पीएच.डी. स्पेशल ॲडमिशन ड्राईव्ह प्रवेश परीक्षा ऑनलाईन पद्धतीने दि.१४ व दि.१५ मे रोजी होणार आहेत. त्याचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

# १६ हजार १५२ विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा २२ मार्चपासून सुरू आहेत. बुधवारी बी.एस्सी., बायो. टेक, बी.एस्सी आयटी, शुगर टेक, फूड प्रोसेसिंग, कॉम्प्युटर सायन्स, बीसीएस, बीबीए, एमसीए, एम.लिब आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. आज परीक्षेसाठी १७ हजार ३३२ विद्यार्थ्यांपैकी १६ हजार १५२ जणांनी परीक्षा दिली.

# शिवाजी विद्यापीठाचा कोरोनामुक्तीसाठी जागर

## जनजागृती, नागरिकांचे समुपदेशन करणार

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठातर्फे कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय सेवा योजना युनिट असणाऱ्या १७८ हून अधिक महाविद्यालयात 'माझं गाव, कोरोनामुक्त गाव' अभियान राबविण्यात येणार आहे. याच्या माध्यमातून कोरोनामुळे निर्माण होत असलेला मानासिक ताण-तणाव, सम पदेशनातून भीती कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.




शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत कोव्हिड-१९ च्या दुसऱ्या लाटेच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात 'माझं गाव, कोरोनामुक्त गाव' अभियान राबविले जाणार आहे. महाविद्यालयीन पातळीवर 'एनएसएस'च्या माध्यमातून कोरोना संसर्ग असलेली किंवा संसर्ग नसलेल्या महाविद्यालयाच्या परिक्षेत्रात अभियानासाठी दत्तक गावाची निवड केली जाणार आहे.

### कोव्हिड योद्धा समिती

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या विद्यापीठस्तरीय कोव्हिड योद्धा समितीच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान चालणार आहे. समितीत प्र-कुलगुरू, कुलसचिव, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष संचालकांसह जिल्हा, विभागीय समन्वयक यांचा समावेश असणार आहे. महाविद्यालयात प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली कोव्हिड योद्धा समिती असणार आहे.

> शिवाजी विद्यापीठातर्फे 'माझं गाव, कोरोनामुक्त गाव' या अभियानात 'एनएसएस'च्या माध्यमातून गावे दत्तक घेऊन त्यांना कोव्हिड-१९ व शासकीय निर्देशादबाबत माहिती दिली जाणार आहे. व्यक्ती, कुटुंब, गाव तणावमुक्त कसे राहील यासाठी ऑनलाईन समुपदेशन केले जाणार आहे. प्रत्येक महाविद्यालयांना पाच गावे दत्तक घेण्याचे आवाहन केले जाणार आहे.
>
> \- **प्रा. अभय जायभाये**, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना कक्ष

गाव दत्तक घेऊन गावात व्यापक स्वरूपात जनजागृती मोहीम राबविली जाणार आहे. दत्तक गावातील स्वयंसेवक व ग्रामस्थांना कोरोना प्रशिक्षण देऊन गाव कोरोनामुक्त कसे राहील याचे मार्गदर्शन केले जाणार आहे. दत्तक गावाचा व्हॉट्सॲप ग्रुप स्थापन करून ऑनलाईन आरोग्यविषयक मार्गदर्शन, समुपदेशन, प्रबोधनात्मक उपक्रम आयोजित केले जातील. गावात १८ वर्षांवरील ग्रामस्थांना लस घेण्यास प्रोत्साहन देणे, मास्क वापरणे, सोशल डिस्टन्सिंगचे महत्त्व पटवून दिले जाणार आहे.

# विद्यापीठातर्फे ऑनलाईन व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभाग, कौशल्ये व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने १० ते १४ मेदरम्यान सायंकाळी ५ ते ६ यावेळेत ज्येष्ठ नागरिकांसाठी ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. १० रोजी डॉ. नवनाथ तुपे-पुणे व प्रा.डॉ. ए. ए. गुरव यांचे 'निराधार ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या', दि. ११ रोजी ना. ना. इंगळे, अकोला यांचे 'ज्येष्ठ नागरिक संघ, संघटना' तर अरविंद पालके यांचे 'आरोग्य व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करतील. दि. १२ रोजी अरुण रोडे, पुणे यांचे 'ज्येष्ठ नागरिक : केंद्र व राज्य शासनाचे धोरण' या विषयावर व प्राचार्य डॉ. श्रीधर हेरवाडे यांचे 'प्रौढत्वी नीजशैशवास जपणे' वर मार्गदर्शन करणार आहेत. दि.१३ रोजी 'ज्येष्ठ नागरिकांना सहकार्य व अभिवाचन' याबाबत प्रकाश बोरगावकर व टी.आर. गुरव मार्गदर्शन करतील. दि. १४ रोजी 'ज्येष्ठ नागरिकांचे बदलत्या काळातील कुटुंबातील स्थान' या विषयावर डॉ. धनंजय लोखंडे व प्रा. डॉ. ए. एम. गुरव मार्गदर्शन करणार आहेत.

# विद्यापीठ करणार नागरिकांचे समुपदेशन

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सोमवारपासून उपक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभाग, कौशल्ये व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने कोरोना महामारीच्या काळात समाजातील विविध घटकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची प्राथमिक काळजी घेण्यासाठी १० ते १५ मे या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत नागरिकांचे ऑनलाईन समुपदेशन करण्यात येणार आहे.

सध्या कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यात संचारबंदी असून, कडक निर्बंध लागू करण्यात आले आहेत. दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्याने नागरिकांचे भीतीचे वातावरण आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने नागरिकांना दिलासा देण्यासाठी ऑनलाईन समुपदेशन करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे.

अरविंद पालके- अक्युप्रेशर (मो. नं. ८०५५७७८९८५), डॉ. श्वेतलिना पाटील - योग व निसर्गोपचार (मो. नं. ७०२०१५०९५६), डॉ. नीलम मोरे- आहार (मो. नं. ९९२२००७७०७), टी. आर. गुरव - समुपदेशन (मो. नं. ९०४९४२०१३६), डॉ. अमोल मिणचेकर - मानसशास्त्र मार्गदर्शन (मो. नं. ९८२२५६७७२०), महेश चव्हाण - मानसिक संतुलन (मो. नं. ७७४३८९२०८९), प्रा. डॉ. ए. एम. गुरव - ताण-तणाव व्यवस्थापन (मो. नं. ९८५००१२५४५), प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव - नेतृत्व विकास (मो. नं. ९४२१२०१९८४) याबाबत ऑनलाईन मार्गदर्शन करणार आहेत. अधिक माहितीसाठी आजीवन अध्ययन व विस्तार अधिविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.